जा.क्र.वि.शा./निवडणुक कक्ष/१३३ ९२/२०२४
पोलीस उप आयुक्त, वि.शा. कार्यालय,पुणे
दिनांक :- १९ /११/२०२४

**विषय :-** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस) २०२३ चे कलम १६३ प्रमाणे मतदान केंद्राचे १०० मीटर चे परिसरातील व्यवसायीक दुकाने व आस्थापना बंद ठेवणे बाबत आदेश.

**आदेश,**

ज्याअर्थी, निवडणूक आयोग, भारत सरकार यांचे मुख्य निवडणुक अधिकारी, भारत सरकार यांचे प्रेसनोट क्र.ECI/PN/149/2024 DATE 15.10.2024 अन्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका घेण्याचा कार्यक्रम जाहीर केलेला आहे. आचारसंहिता दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासून निवडणूकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अस्तित्वात राहील. महाराष्ट्रातील सर्व विधानसभा मतदारसंघात मतदान दिनांक २०/११/२०२४ रोजी होणार आहे.

पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ विधानसभा मतदार संघात एकुण ७१६ मतदान केंद्रे (इमारत) मधील ३३३१ बुथवर मतदान होणार आहे. मतदान सुरळीत व शांततेत पार पाडणेसाठी, सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये, यासाठी सदर मतदान केंद्रांच्या परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराच्या जागेचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी रंजन कुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बी.एन.एस.एस) २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी पुणे पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात १९८ शिरुर, २०२ पुरंदर, २०३ भोर, २०८ वडगावशेरी, २०९ शिवाजीनगर, २१० कोथरुड, २११ खडकवासला, २१२ पर्वती, २१३ हडपसर, २१४ पुणे कॅन्टोंमेंन्ट व २१५ कसबा पेठ विधानसभा मतदार संघात एकुण ७१६ मतदान केंद्रे (इमारत) मधील ३३३१ बुथच्या १०० मीटर परिसरात दिनांक २०/११/२०४४ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया संपेपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) ७१६ मतदान केंद्रांचे (इमारतीचे) १०० मीटर परिसराचे आतील सर्व व्यवसायीक दुकाने, रेस्टॉरंन्ट, टपऱ्या (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना बंद ठेवावेत.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय न्याय संहिता कलम २२३ अन्वये शिक्षेस पात्र राहील. सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि१९/११/२०२४ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर
दिनांक :-१९/११/२०२४

पोलीस सह आयुक्त पुणे शहर

(रंजन कुमार शर्मा)
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर